जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-28

वरुड | शुक्रवार
२७.०३.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: ५५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## थोडक्यात

### बेस्ट बसेसना टोलमाफी द्या!

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** - आर्थिक कोंडी फोडण्यासाठी बेस्ट उपक्रमाच्या वतीने विविध उपाययोजना आखल्या जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बेस्ट बसेसना टोलमाफी द्यावी, अशी मागणी बेस्ट समिती अध्यक्ष तृष्णा विश्वासराव यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. एसटी महामंडळाच्या गाड्यांना पथकरातून वगळण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठवलेल्या पत्रात, बेस्ट उपक्रमाकडून महापालिका हद्दीच्या पलीकडे ठाणे, नवी मुंबई आणि मीरा-भाईंदर या ठिकाणच्या ४० बसमार्गांवर ३८२ बसगाड्यांमार्फत २०४६ बसफेऱ्या करण्यात येतात. या बसगाड्यांना पथकर नाक्यावर बेस्ट उपक्रमातर्फे पथकर प्रदान करण्यात येतो.

# होर्मुझवर इराणची घट्ट पकड, युद्ध आणखी भडकणार?

## मध्यपूर्वेतील युद्धात मोठी ठिणगी पडण्याची शक्यता

(प्रतिनीधी वरूड दर्पण)






**दुबई** - इराण आणि अमेरिका यांच्यातील पेचप्रसंग गुरुवारी अधिक गडद होताना दिसला. चर्चेच्या मुद्द्यावरून दोन्ही बाजूंनी आपली भूमिका अधिक ताठर केली असून, मध्यपूर्वेतील युद्धात आणखी एक मोठी ठिणगी पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

हजारो अतिरिक्त अमेरिकन सैन्य या क्षेत्राच्या दिशेने कूच करत असताना, तेहरानने अत्यंत महत्त्वाच्या अशा होर्मुझच्या सामुद्रधुनीवर आपले नियंत्रण अधिक मजबूत केले आहे.

इस्रायलमध्ये इराणकडून येणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या माऱ्यामुळे धोक्याचे सायरन वाजत आहेत, तर आखाती देश हे हल्ले हवेतच रोखण्यासाठी प्रयत्न करत आहेत. इराणची राजधानी आणि इतर शहरांमध्ये मोठ्या स्फोटांचे वृत्त आहे.

हे युद्ध आता 'कोण जास्त हानी सोसू शकते' या मुद्द्यावर येऊन ठेपले आहे. अमेरिकेने आपली उद्दिष्टे वेळोवेळी बदलली असली तरी ती अत्यंत महत्त्वाकांक्षी आहेत. यामध्ये इराणचे क्षेपणास्त्र आणि अणु कार्यक्रम यापुढे धोका ठरणार नाहीत याची खात्री करणे आणि प्रादेशिक सशस्त्र गटांना तेहरानकडून मिळणारा पाठिंबा संपवणे यांचा समावेश आहे. वॉशिंग्टनने एका टप्प्यावर इराणमधील 'थियोक्रसी' (धार्मिक राजवट) उलथून टाकण्याचाही प्रयत्न केला होता. अमेरिका आणि इस्रायलच्या मोहिमेने इराणच्या लष्करी आणि सरकारी यंत्रणेला मोठा तडाखा दिला असून, अनेक वरिष्ठ नेत्यांना ठार केले आहे आणि शेकडो लक्ष्यांवर हल्ले केले आहेत. तरीही इराणकडून क्षेपणास्त्रांचा मारा सुरूच आहे आणि सरकारविरुद्ध उठाव झाल्याचे कोणतेही चिन्ह दिसत नाही.

दुसरीकडे, इराणच्या नेतृत्वासाठी केवळ या हल्ल्यांतून स्वतःला टिकवून धरणे हाच एक विजय मानला जाऊ शकतो. इराणला कदाचित अशी आशा आहे की, होर्मुझच्या सामुद्रधुनीवर ताबा मिळवून जागतिक अर्थव्यवस्थेला खिळ बसवल्यामुळे अमेरिका माघार घेईल. यामुळे जगभरातील इंधनाचे दर, किराणा मालाचे भाव आणि व्यवसायांवरील खर्च प्रचंड वाढला आहे. एका आखाती अरब गटाने गुरुवारी सांगितले की, इराण जहाजांच्या सुरक्षित प्रवासासाठी आता 'टोल' (शुल्क) वसूल करत आहे. अमेरिका आणि इराण या दोघांनीही आपल्या मागण्यांची यादी सादर केली आहे, परंतु सध्या कोणताही तोडगा निघताना दिसत नाही.

# दीड लाखांपर्यंत कॅशलेस उपचार

## अपघातग्रस्तांसाठी 'पीएम-राहत' योजना प्रभावीपणे राबवा : आरोग्य मंत्री

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – रस्ते अपघातात जखमी होणाऱ्या नागरिकांना तातडीने दीड लाखांपर्यंतचे कॅशलेस उपचार मिळतात. 'पीएम-राहत' योजनेच्या माध्यमातून कॅशलेस उपचार मिळत असल्याने ही योजना प्रभावीपणे राबवा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. रुग्णाला 'गोल्डन अवर'मध्ये तातडीचे उपचार देऊन मृत्युदर कमी करण्यास वचनबद्ध व्हावे, असे आवाहन आरोग्य मंत्र्यांनी जनआरोग्य योजनेच्या बैठकीत केले आहे.

केंद्र शासनाच्या रस्ते परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने रस्ते अपघातातील जखमींना तातडीने उपचार मिळावेत, यासाठी 'पीएम-राहत' योजना आणली आहे. या योजनेअंतर्गत 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' व 'महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना'अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या राज्यातील कोणत्याही रुग्णालयात दाखल झालेल्या अपघातग्रस्तांना तातडीने ७ दिवसांपर्यंत दीड लाख रुपयापर्यंतचे उपचार पूर्णतः निशुल्क देण्यात येणार आहेत. अनेकदा अपघात झाल्यावर आर्थिक अडचणींमुळे उपचारास विलंब होतो. वेळेत उपचार मिळत नाहीत. 'पीएम-राहत' योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास अपघाती मृत्यूचे प्रमाण कमी होईल, असा विश्वास आरोग्य मंत्र्यांनी व्यक्त केला आहे. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त डॉ.कादंबरी बलकवडे, जनआरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणासाहेब चव्हाण, नागरी आरोग्य अभियान आयुक्त सुनील भोकरे, जन आरोग्य योजनेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दयानंद जगताप, आरोग्य विभागाच्या सह संचालिका डॉ.सुनीता गोल्हाईत व प्रमुख अधिकारी उपस्थित होते. डिझिग्रेटेड व नॉनडिझिग्रेटेड रुग्णालयात उपचार! रस्ते अपघातानंतर २४ तासांच्या आत रुग्णालयात दाखल झालेल्या सर्व अपघातग्रस्त भारतीय तसेच परदेशी नागरिकांनाही 'पीएम राहत' योजनेचा लाभ मिळणार आहे.

# खडीने भरलेल्या हायवाने धडक देताच कारने घेतला पेट

## आई आणि मुलाचा होरपळून मृत्यू

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**बीड** – अहिल्यानगर राज्य महामार्गावर काळीज पिळवटून टाकणारी घटना समोर आली. खडीने भरलेल्या भरधाव हायवाने कारला समोरासमोर जोरदार धडक दिली. बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावर काळीज पिळवटून टाकणारी घटना समोर आली. खडीने भरलेल्या भरधाव हायवाने कारला समोरासमोर जोरदार धडक दिली. या भीषण धडकेमुळे कारने अचानक पेट घेतला आणि त्यामध्ये असलेल्या आई आणि मुलाला बाहेर पडता न आल्याने होरपळून जागीच मृत्यू झाला. केज तालुक्यातील साळेगाव येथील रहिवासी असलेले हे दोघेजण कारमधून बीडच्या दिशेने जात होते. याचवेळी बीडकडून डोईठाणकडे खडी घेऊन जाणाऱ्या एका भरधाव हायवाने कापशी गावाजवळ कारला समोरून जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, कारच्या इंजिनने तात्काळ पेट घेतला. कारने पेट घेतल्याने आत असलेल्या आई-मुलाला दरवाजा उघडून बाहेर पडता आले नाही. बघता बघता आगीने रौद्र रूप धारण केले आणि मदतीसाठी लोक धावण्यापूर्वीच दोघांचा कारमध्येच होरपळून मृत्यू झाला. या घटनेमुळे महामार्गावर मोठी गर्दी झाली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा सुरू केला आहे.

# क्यूआर रँकिंगमध्ये सहा भारतीय संस्था : विषयानुरुप यादीत पहिल्या ५० मध्ये चार आयआयटी, जेएनयूसह बिट्स पिलानीचा समावेश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)






**मुंबई** _ जागतिक क्रमवारीत उच्च शिक्षणाच्या स्पर्धेत भारतीय संस्थांना यंदा स्थान मिळाले आहे. 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग्स बाय सब्जेक्ट'मध्ये भारतातील सहा प्रमुख संस्थांना विषयानुरूप क्रमवारीत जगातील पहिल्या ५० संस्थांमध्ये स्थान मिळाले आहे.

क्यूएस रँकिंगमध्ये चार भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (जेएनयू) आणि बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स पिलानी (बिट्स पिलानी) यांचा समावेश आहे. लंडनस्थित क्यूएस क्वाकरेल्ली सायमंड्स ही संस्था दरवर्षी जगभरातील उच्चशिक्षण संस्थांचे गुणांकन आणि मूल्यांकन करते. या संस्थेने जाहीर केलेल्या या क्रमवारीत जगभरातील १०० हून अधिक देशांतील सुमारे १९०० विद्यापीठांमधील २१ हजारांहून अधिक अभ्यासक्रमांचे मूल्यमापन करण्यात आले. ५५ विषय आणि पाच व्यापक शैक्षणिक क्षेत्रांमध्ये ही क्रमवारी निश्चित करण्यात आली आहे.

यंदाच्या क्रमवारीत भारताने विविध विषयांमध्ये तब्बल २७ वेळा पहिल्या ५० मध्ये स्थान मिळवले आहे. ही संख्या गेल्या वर्षीच्या १२ च्या तुलनेत दुपटीहून अधिक वाढली आहे. विशेष म्हणजे, ही कामगिरी देशातील १२ संस्थांनी केली आहे. या यादीत आयआयटी मुंबई, आयआयटी दिल्ली, आयआयटी खरगपूर आणि आयआयटी मद्रास या आयआयटींचा समावेश आहे.

# एअर इंडिया एक्स्प्रेसवर भारतीय संस्कृतीची छाप

## द फ्लाइंग कॅनव्हास विशेष कलाकृती रेखाटली

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**मुंबई** – एअर इंडिया एक्स्प्रेसने 'द फ्लाइंग कॅनव्हास' या विशेष कलाकृतीने नटलेल्या बोईंग '७३७-८' विमानाचे अनावरण केले आहे.

समकालीन कलाकार ओशिन शिवा यांच्या मूळ कलाकृतीने वेढलेले 'व्हीटी-बीडब्लूव्ही' हे विमान, भारतीय विमान कंपनीच्या ताफ्यातील पहिलेच विमान ठरले आहे. एअर इंडिया एक्स्प्रेस आता प्रत्येक विमानाच्या मागील भागावर वैविध्यपूर्ण कलाप्रकार प्रदर्शित करून भारताचा सांस्कृतिक आणि कलात्मक वारसा वाढवत आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये एअर इंडियाच्या नवीन ब्रँड ओळखीचे औचित्य साधून 'टेल्स ऑफ इंडिया' हा उपक्रम सुरू झाला.

याअंतर्गत राजा रवी वर्मा यांच्या चित्रांपासून ते राष्ट्रीय वारसा स्मारके आणि कथकली, कथक व भरतनाट्यम यांसारख्या शास्त्रीय कलाप्रकारांच्या रूपांतरांचा समावेश केला.

प्रत्येक नवीन विमानाच्या शेपटीवर कलमकारी, बांधणी, कांजीवरम आणि बनारसी यांसारख्या देशी हस्तकला, वस्त्रोद्योग आणि परंपरांपासून प्रेरित एक अद्वितीय कलात्मक डिझाइन पाहायला मिळते.



# सोलापुरातील बोरामणी नाका परिसरात भीषण अपघात

## ट्रक आणि मोटरसायकलमध्ये जोरदार धडक, दोघांचा जागीच अंत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**सोलापूर** – सोलापूर शहरातील बोरामणी नाका परिसरात भीषण अपघाताची घटना घडली आहे. ट्रक आणि मोटरसायकलमध्ये जोरदार धडक झाली आहे. हा अपघात इतका भीषण होता कि त्यात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. या मृतांमध्ये सैपन पटेल आणि हुजूर पटेल यांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, हा संपूर्ण अपघात सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पुढील तपास सुरू केला आहे.

भाविक पंढरपूर येथील देवदर्शनासाठी जात असताना भीषण अपघात, दोन जण जागीच ठार साताऱ्यातील म्हसवड शहरालगतच्या धुळदेव गावच्या हद्दीत आज सकाळी सातारा –पंढरपुर रस्त्यावर झालेल्या भीषण अपघातामध्ये दोन जण जागीच ठार झाले आहेत. तर तीन जण गंभीर जखमी झाले आहे. अर्धवट कामामुळे वर्षभरात शेकडो लोकांचे बळी गेले असून प्रशासन गांधारीच्या भूमिकेत असल्याने गरिकांचा मोठा रोष व्यक्त होत आहे. साताऱ्यातील भाविक पंढरपूर येथील देवदर्शनासाठी जात असताना आज सकाळी म्हसवड जवळच्या धुळदेव येथे आले असता, धुळदेव गावच्या हद्दीत उखडलेल्या रस्त्याच्या कामाचा अंदाज न आल्यामुळे अल्टो कार पलटी झाली. यामधील दोन जण ठार झाले आहेत. तर अन्य तीन जण जखमी झाले आहेत.

# दोन महिन्यांचीच इंधनशिदारी! केंद्र सरकारचे अखेर इंधन स्थितीबाबत स्पष्टीकरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – देशात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा कोणताही तुटवडा नसून पुढील ६० दिवस पुरेल इतका इंधन साठा उपलब्ध असल्याचे केंद्र सरकारने गुरुवारी स्पष्ट केले.

पश्चिम आशियातील युद्धामुळे इंधन टंचाई निर्माण झाल्याच्या वावड्या उठवून जाणीवपूर्वक घबराट पसरवली जात असून, नागरिकांनी अशा अफवांना बळी पडू नये, असे आवाहन पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने केले आहे. देशातील सर्व पेट्रोल पंप पूर्ण क्षमतेने सुरू असून कुठेही इंधन रेशनिंगचे आदेश दिलेले नाहीत, असे सरकारने स्पष्ट केले. पश्चिम आशियातील संकटामुळे इराणमधून होणारा कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला असला, तरी भारताने इतर देशांकडून पुढील दोन महिन्यांसाठीचा साठा आधीच निश्चित केला आहे. देशातील सर्व रिफायनरी सध्या १०० टक्क्यांहून अधिक क्षमतेने कार्यरत असून पुरवठ्यामध्ये कोणतीही तूट नाही.

**वरुड :** नगराध्यक्ष ईश्वर सलामे यांना त्यांच्या दालनामध्ये वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना न.प.आरोग्य सभापती विनय खासबागे, नगरसेवक संदीप देवते, हरिष वरखेडकर, प्रफुल महाजन, निलेश अधव, मोरेश्वर वानखडे, राजेंद्र टेकाडे, रवि कपिले, न.प.बांधकाम सभापती जीवन मालपे, नगरसेवक नितेश धुर्वे, माजी नगरसेवक राजेंद्र काळे, मुरलीधर पवार.









# शारती माफ योजनेस ठाणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## पालिकेच्या तिजोरीत एका दिवसात १३.५० कोटींची भर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**ठाणे :** – महापालिकेने थकीत मालमत्ता कर तसेच चालू वर्षाचा कर भरणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी दंडावर ९० टक्के सूट देण्याची विशेष योजना जाहीर केली होती. या योजनेनुसार, करदात्यांनी मूळ करासोबत केवळ १० टक्के दंड भरल्यास उर्वरित ९० टक्के शास्ती माफ करण्यात येत आहे. या योजनेला ठाणेकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, निवासी करदात्यांसाठी लागू करण्यात आलेल्या या दंडमाफी योजनेला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, २५ मार्च या मुदतवाढीपूर्वीच्या शेवटच्या दिवशीच मालमत्ता कर विभागाने तब्बल १३.५० कोटी रुपयांची वसुली करण्यात यश मिळवले आहे.

महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी महासभेत दिलेल्या निर्देशानुसार, २५ मार्चला संपणारी ही योजना ३१ मार्चपर्यंत सुरू ठेवण्यात आली आहे. सुरुवातीला ही सवलत योजना १२ मार्च ते २५ मार्च या कालावधीत लागू करण्यात आली होती. या कालावधीत पालिकेच्या तिजोरीत एकूण ५७ कोटी रुपयांची भर पडली, तर केवळ २५ मार्च या एका दिवसातच १३.५० कोटींची वसुली झाली. ठाणे महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाला यंदा ९२० कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. जानेवारी अखेरपर्यंत ५६५ कोटी रुपये जमा झाले होते, तर फेब्रुवारी अखेर ही रक्कम ६३० कोटींवर पोहोचली होती.

# लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये सुरक्षा घोषणा सुरू करा : मुंबई उच्च न्यायालयाची रेल्वेला सूचना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – 'वंदे भारत' एक्स्प्रेस मधील पद्धतीप्रमाणेच, रेल्वे प्राधिकरणाने सर्व लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये सार्वजनिक सुरक्षा घोषणा सुरू कराव्यात आणि त्यात गाडी कोणत्या स्थानकांवर थांबणार आहे याची स्पष्ट माहिती द्यावी, अशी सूचना मुंबई उच्च न्यायालयाने केली आहे.

न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या एकल पीठाने मंगळवारी दिलेल्या निकालात प्रवाशांना धावती ट्रेन पकडण्याचा किंवा उतरण्याचा प्रयत्न करून आपला जीव धोक्यात न घालण्याचा इशाराही दिला. १० वर्षांपूर्वी जळगाव रेल्वे स्थानकावर धावत्या ट्रेनमधून उतरताना जखमी झालेल्या एका व्यक्तीला ८० हजार रुपये भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. न्यायालयाने नमूद केले की, लोकल ट्रेनमध्ये डिस्प्ले बोर्ड किंवा उद्घोषणा असते की, ट्रेन कोणत्या स्थानकावर थांबणार नाही.

मात्र, लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या बाबतीत प्लॅटफॉर्मवर अशी यंत्रणा नसते. जेव्हा गाडी कोणत्या स्थानकावर थांबणार नाही याची कोणतीही घोषणा केली जात नाही, तेव्हा अशा स्थानकावर उतरण्याचा किंवा चढण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रवाशाचा दोष मानला जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले.

# हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलना साठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे.

केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून फिलेरियासिसचा पूर्णतः नायनाट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या फिलेरिया सिससारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली होती. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्रात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र शासनाकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, भारतातून फिलेरियासिस निर्मूलन करण्याच्या पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते. महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत.

राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. तज्ज्ञांच्या मते, 'आयडीए' उपचारामुळे मायक्रो फिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो.

# 'डेक्कन क्वीन'चा आज महोत्सव : ऐतिहासिक गाडीचे नूतनीकरण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – गौरवशाली डेक्कन क्वीन एक्स्प्रेसचा 'रेल्वे महोत्सव' साजरा करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे २७ मार्च रोजी हा महोत्सव साजरा होणार आहे. या निमित्ताने प्रवाशांचा प्रवास आरामदायी होण्यासाठी तसेच तिचे ऐतिहासिक आकर्षण जपण्यासाठी डेक्कन क्वीनचे नूतनीकरण करण्यात आले आहे.

मुंबई आणि पुणे शहरांना जोडणारी डेक्कन क्वीन १ जून १९३० रोजी सुरू झाली. ही भारतातील पहिली डिलक्स ट्रेन आहे. भारतातील पहिली सुपरफास्ट ट्रेन, पहिली लांब पल्ल्याची इलेक्ट्रिक इंजिन असलेली प्रवासी ट्रेन आणि व्हॅस्टिब्युल असलेल्या पहिल्या काही रेल्वेंपैकी हि एक गाडी आहे. ही गाडी 'फक्त महिलांसाठी' डबा आणि 'डायनिंग कार' असलेली पहिली गाडी होती.

# पीएम श्री जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेमध्ये माता पालक मेळावा उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – पीएम श्री जिल्हा परिषद पुर्व माध्यमिक शाळा टेंभुरखेडा येथे माता पालक मेळावा नुकताच आयोजीत करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला सरपंच रोशनी निंभोरकर, प्रमुख अतिथी म्हणुन शाळा व्यवस्थापन समिती तथा शालेय पोषण आहार समिती सदस्य राजेंद्र धोटे, ग्रामपंचायत सदस्य लता वानखेडे, अरुणा सालोडे, ललिता युवनाते, संगिता घोडकी व्यासपिठावर उपस्थित होत्या.




कार्यक्रमाचे प्रास्तविकात रविद्र सुरजुसे यांनी मुलांच्या आयुष्याची पहिली शाळा म्हणजे त्यांचे घर आणि पहिले गुरु म्हणजे त्यांची माता असते असे सांगितले.

जिल्हा परिषद पुर्व माध्यमिक शाळा येथे घेण्यात आलेल्या माता पालक मेळाव्यात अनेक मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी राजेंद्र धोटे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आदर्श शिक्षिका अर्चना म्हाला, वनिता कडू, स्नेहलता खणखने, रेखा झामडे, वृषाली फुसे, उर्मिला मावळे, शालेय पोषण आहारच्या निर्मला सदारंग, ललिता लांडगे, शालु सोनुले यांना साडी चोळी व सरपंच रोशनी निंभोरकर यांना शाल व श्रीफळ म्हणुन भेटवस्तू देण्यात आली. मुख्याध्यापक रविद्र सुरजुसे यांनी घेतलेला हा अभिनव उपक्रम खरोखरच प्रेरणादायी कार्यक्रम ठरल्याचे यावेळी अनेकांनी सांगितले. याप्रसंगी रोशनी निंभोरकर यांनी आज महिलांचा सन्मान व भेटवस्तू दिल्या ही खरोखरच महिलांसाठी सन्मानाची बाब आहे, असे सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रविद्र सुरजूसे, दिनेश ठाकरे, अरुण यावले, श्याम महल्ले, घोषणा राऊत यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला वनिता कोसे, सुनीता लांडगे, सुमन वानखडे, मनस्वी राऊत, श्वेता पेठे, श्रद्धा देशमुख, पुष्पा मुंदाफडे, गीता कडू, शिला हिवसे, शीला कुबडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन रविद्र सुरजुसे तर आभार दिनेश ठाकरे यांनी मानले.

# संपादकीय

चांगला स्वभाव हा गणितातल्या शून्यासारखा असतो. ज्याच्यासोबत असतो त्याची किंमत वाढवतो

## भोंदूगिरीचे साम्राज्य आणि राजकीय अभय : एक सामाजिक कीड

भोंदूबाबांनी उभ्या केलेल्या कोट्यवधींच्या साम्राज्याचा पर्दाफाश होणे, ही आता आपल्या समाजासाठी नवी बाब राहिलेली नाही. दर काही महिन्यांनी एका नव्या 'बाबा'चे काळे कारनामे समोर येतात, त्यांच्या आश्रमांतून अफाट संपत्ती जप्त केली जाते आणि अटकेची कारवाई होते. मात्र, प्रश्न केवळ एका व्यक्तीच्या अटकेचा नसून, त्या व्यवस्थेचा आहे जी अशा प्रवृत्तींना जन्म देते आणि जोपासते. भोंदूगिरीच्या या अवाढव्य इस्टेटीमागे केवळ अंधश्रद्धा नसून राजकीय पाठबळ आणि प्रशासकीय डोळेझाक हे मुख्य स्तंभ आहेत, हे कटू सत्य आता मान्य करण्याची वेळ आली आहे.

राजकीय साटेलोटे आणि इस्टेट

कोणताही भोंदूबाबा एका रात्रीत कोट्यवधींचा मालक बनत नाही. त्यामागे वर्षानुवर्षांचे नियोजन असते. जेव्हा या बाबांच्या दरबारात सत्तेतील बडे नेते हजेरी लावतात, तेव्हा सामान्य जनतेमध्ये त्या बाबाबद्दलची विश्वासार्हता वाढते. 'जो मंत्र्यांना आशीर्वाद देतो, तो आपल्याला का देऊ शकणार नाही?' या मानसिकतेचा फायदा हे भोंदू घेतात. बदल्यात, हे बाबा निवडणुकीच्या काळात आपल्या भक्तगणांच्या रूपाने हक्काची 'व्होट बँक' नेत्यांच्या पदरात टाकतात. या 'देण्या-घेण्याच्या' व्यवहारातूनच या बाबांना जमिनींचे अनधिकृत वाटप, आश्रमांसाठी सवलती आणि गुन्हेगारी कृत्यांना संरक्षण मिळते. राजकीय पाठबळ असल्याशिवाय इतकी मोठी संपत्ती कोणाच्याही नजरेत न पडता जमा होणे निव्वळ अशक्य आहे.

कारणांचा शोध घेणे गरजेचे

केवळ कायद्याने किंवा अटकेने ही समस्या सुटणार नाही. त्यामागची सामाजिक कारणे शोधणे आवश्यक आहे. आजचा सामान्य माणूस प्रचंड मानसिक ताणतणाव, आर्थिक असुरक्षितता आणि कौटुंबिक समस्यांनी वेढलेला आहे. जेव्हा विज्ञान आणि व्यवस्था त्याला आधार देण्यात अपयशी ठरतात, तेव्हा तो चमत्कारांच्या आशेने अशा बाबांच्या जाळ्यात अडकतो. शिक्षणाचा अभाव हे एकमेव कारण नसून, उच्चशिक्षित लोकही स्वतःच्या स्वार्थासाठी किंवा भीतीपोटी या भोंदूगिरीचे बळी ठरताना दिसतात. विवेकाचा अभाव आणि झटपट यश मिळवण्याची लालसा ही या प्रवृत्तीला खतपाणी घालणारी मुख्य कारणे आहेत.

भविष्यातील धोका आणि उपाय

जर अशा प्रकरणांना वेळीच पायबंद घातला नाही, तर भविष्यात ही परिस्थिती अधिक भयावह होईल. हे भोंदू केवळ आर्थिक लूट करत नाहीत, तर ते समाजाच्या मानसिकतेचे खच्चीकरण करतात. ते समांतर सत्ताकेंद्र उभी करतात, जी लोकशाही आणि संविधानाला आव्हान देऊ शकतात. 'अंधश्रद्धा निर्मूलन' कायद्याची अधिक कडक अंमलबजावणी होणे काळाची गरज आहे. त्याचबरोबर, राजकीय नेत्यांनी अशा बाबांच्या दरबारात जाणे टाळून सामाजिक जबाबदारीचे भान राखले पाहिजे. भोंदूगिरी ही समाजाला लागलेली वाळवी आहे.

## डाएट आणि सोशल मीडियाचा लोचा

**बंडू:** (हातात कडू कारल्याचा ज्यूस घेऊन) 'गण्या, आजपासून माझं 'न्यू लाईफ मिशन' सुरू झालंय. नो साखर, नो वडापाव! फक्त हेल्दी डाएट!'

**गण्या:** 'अरे वा! पण हे मिशन नक्की कशासाठी? आरोग्यासाठी की इन्स्टाग्रामवर फोटो टाकण्यासाठी?'

**बंडू:** 'दोन्ही! बघ ना, फोटोमध्ये माझं पोट कसं बाहेर दिसतंय. आता हा कारल्याचा ज्यूस पिऊन मी एकदम फिट होणार.'

**गण्या:** 'अरे, पण मगाशीच तू हॉटेलच्या बाहेर 'पुढच्या सोमवारपासून डाएट नक्की' असं म्हणत दोन प्लेट मिसळ हाणताना दिसला होतास, त्याचं काय?'

**बंडू:** (कावराबावरा होऊन) 'ते... ते चीट मील होतं रे! मोठ्या कामाची सुरुवात करताना थोडं गोड-तिखट खावं लागतं.'

**गण्या:** 'बरं, मग आता हा ज्यूस पिऊन दाखव बघू.'

**बंडू:** (एक घोट घेतो आणि तोंड कडू करतो) 'अय्या... हा तर विषासारखा लागतोय! गण्या, तुला वाटतं का खरंच लोक हे पिऊन जगतात?'

**गण्या:** 'लोक जगतात की नाही माहिती नाही, पण तो ज्यूस पिण्यापेक्षा त्याचा फोटो काढून 'हेल्दी मॉर्निंग' असं कॅप्शन टाकलं की तुझं अर्ध वजन तिथेच कमी होतं, असं सध्याचं शास्त्र सांगतं!'

**बंडू:** 'Correct बोललास! थांब, आधी सेल्फी घेतो. ज्यूस पिणं महत्त्वाचं नाही, जगाला दाखवणं महत्त्वाचं आहे. एकदा फोटो टाकला की मग आपण गुपचूप चहा-बिस्किट खायला जाऊया!'

**गण्या:** 'चल मग, तुझ्या या 'कडू' डाएटचा 'गोड' शेवट चहानेच करूया!'

# प्रकरण खरातचे : पण आरसा समाजाचा!!

नाशिकमधील तथाकथित भोंदू अशोक खरात प्रकरण सध्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर चर्चेत आहे. या प्रकरणातील सर्वांत भयावह बाब म्हणजे अनेक महिलांवर झालेला छळ, फसवणूक आणि लैंगिक शोषण. त्यामुळेच या प्रकरणाला मोठे बातमीमूल्य प्राप्त झाले आहे. मात्र या प्रकरणाची समाजमाध्यमांवरील चर्चा पाहिली असता आपल्या समाजाच्या संवेदनशीलतेबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित होतात.

या प्रकरणात पीडित महिलांची मानसिक अवस्था काय असेल, त्यांच्या मनात किती भीती, अपराधगंड, असुरक्षितता आणि वेदना असतील यावर गंभीर चर्चा व्हायला हवी होती. परंतु प्रत्यक्षात तशी संवेदनशीलता दिसून येत नाही. उलट काही व्हिडिओ आणि फोटो अधिक स्पष्ट करून, कोणताही विचार न करता मोठ्या प्रमाणावर समाजमाध्यमांवर व्हायरल केले जात आहेत. चेहेरे ओळखू येतील अशा पद्धतीने ते प्रसारित केले जात आहेत आणि त्यावर टवाळ, अश्लील व अत्यंत असंवेदनशील टिप्पण्या केल्या जात आहेत.

हे पाहताना मन सुन्न होते. कारण हा विषय मनोरंजनाचा नाही; हा अत्यंत गंभीर सामाजिक चिंतनाचा विषय आहे. मात्र समाजातील एका मोठ्या घटकाने त्याला केवळ चघळण्याचा विषय बनवलेले दिसते.

थोडा वेळ थांबून आपण एक गोष्ट कल्पना करून पाहूया.



समजा या प्रकरणातील एखादी स्त्री पीडित असेल; परंतु स्वतःची अब्रू आणि कुटुंबाचा सन्मान जपण्यासाठी तिने अजून पुढे येण्याचे धाडस केले नसेल. तिच्या मनात या क्षणी किती भयंकर वादळ सुरू असेल याची आपण कल्पना करू शकतो का?

कदाचित तिच्या कुटुंबीयांना एवढे तरी माहिती असेल की ती कधीतरी त्या व्यक्तीकडे गेली होती. त्यामुळे त्यांच्या मनातही संशयाची सावली असू शकते - तिलाही काही भयंकर अनुभवाला सामोरे जावे लागले असेल का? तिच्यावरही अत्याचार झाला असेल का? घरातील लोकांना कदाचित थेट विचारण्याची हिंमत होत नसेल; पण त्यांच्या मनातही प्रचंड गोंधळ आणि अस्वस्थता निर्माण झाली असेल.

आणि त्या स्त्रीच्या मनात तर आणखी वेगळाच मानसिक ताण सुरू असू शकतो. या प्रकरणात अनेक व्हिडिओ सापडल्याची चर्चा सुरू आहे. तिच्या मनात कदाचित एक भीती सतत डोकावत असेल - त्या व्हिडिओंपैकी एखाद्यात तिचाही व्हिडिओ असेल का? तो पोलिसांच्या हाती लागला असेल का? उद्या तो समाजमाध्यमांवर व्हायरल झाला तर? त्या क्षणी तिच्या सन्मानाचे काय होईल?

अशा असंख्य प्रश्नांच्या ओझ्याखाली एखादी स्त्री किती भयानक मानसिक ताण सहन करत असेल याची आपण कल्पना तरी करतो का? पण याच वेळी समाजमाध्यमांवर या प्रकरणातील फोटो आणि व्हिडिओ अधिक स्पष्ट करून शेअर केले जात आहेत आणि त्यावर टवाळखोर टिप्पण्या केल्या जात आहेत. जणू काही हा एखादा मनोरंजनाचा विषय आहे. ही विसंगतीच अत्यंत अस्वस्थ करणारी आहे.

क्षणभर आपण स्वतःला एक साधा प्रश्न विचारायला हवा - जर या महिलांपैकी एखादी आपली आई, बहीण किंवा मुलगी असती, तर आपण अशीच वागणूक दिली असती का? तिचे फोटो-व्हिडिओ समाजमाध्यमांवर टाकून त्यावर टिप्पणी करत बसलो असतो का? कदाचित नाही. मग इतर कोणाच्या आई-बहिणीबद्दल आपण इतके कठोर आणि असंवेदनशील कसे होतो?

या प्रकरणातील एक महत्त्वाची गोष्ट समाजाने समजून घेतली पाहिजे - या महिला दोषी नाहीत; त्या पीडित आहेत. त्या फसवलेल्या आहेत, दिशाभूल झालेल्या आहेत, काही वेळा ब्लॅकमेल केलेल्या आहेत आणि काही वेळा दहशतीखाली ठेवलेल्या आहेत. अशा तथाकथित बुवांकडून अनेकदा भावनिक, मानसिक आणि कधी कधी शारीरिक दबाव टाकून स्त्रियांना वश केले जाते. परंतु समाज त्यांच्या वेदना समजून घेण्याऐवजी त्यांच्या चारित्र्यावरच संशयाची सावली टाकतो.

यामागे एक मोठे कारण आहे - आपल्या समाजात खोलवर रुजलेली पुरुषप्रधान मानसिकता. स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून न पाहता तिच्याकडे संशयाने किंवा नियंत्रणाच्या दृष्टीने पाहण्याची प्रवृत्ती अजूनही मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. त्यामुळे एखाद्या घटनेत स्त्री पीडित असली तरी समाजाचा पहिला प्रश्न तिच्यावरच उभा राहतो - ती तिथे गेलीच का?, तिने विश्वास का ठेवला?

ही मानसिकता बदलल्याशिवाय अशा घटना थांबणार नाहीत. कारण सत्य हे आहे की अशा घटनांमध्ये केवळ एखादा व्यक्ती दोषी नसतो; समाजाच्या मानसिकतेचाही त्यात काही अंश असतो. ज्या समाजात स्त्रियांना दोष देण्याची सवय आहे, जिथे त्यांच्या वेदनांपेक्षा त्यांच्या चुका शोधल्या जातात, जिथे त्यांच्या सन्मानापेक्षा त्यांच्या बदनामीची भीती मोठी असते - त्या समाजात पीडित स्त्रिया पुढे येण्यास घाबरतात. आणि त्या भीतीतूनच अशा विकृत लोकांचे धाडस वाढते.

म्हणूनच या प्रकरणाकडे केवळ एका व्यक्तीच्या गुन्ह्याच्या रूपात पाहणे पुरेसे नाही. हा प्रसंग समाजाला स्वतःकडे पाहण्याची संधी देणारा आहे. आपल्या संवेदनशीलतेचा, आपल्या स्त्रीदृष्टीचा आणि आपल्या सामाजिक जबाबदारीचा हा एक आरसाच आहे.

आज सर्वांत मोठी गरज आहे ती संवेदनशीलतेची. पीडितांकडे कुतूहलाने नव्हे, तर करुणेने पाहण्याची. त्यांच्या वेदना समजून घेण्याची. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्त्रीच्या सन्मानाला आपल्या समाजजीवनाचा केंद्रबिंदू मानण्याची. कारण शेवटी प्रश्न फक्त एका प्रकरणाचा नाही; प्रश्न आहे आपण कसा समाज घडवतो आहोत याचा.



**प्रफुल्ल मंदा श्रीधर**
जिल्हा कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अमरावती मो.९६६५१८५४२८

# हा तर महाराष्ट्राच्या आत्म्याचा संघर्ष

**महाराष्ट्र एका निर्णायक टप्प्यावर उभा आहे. एका बाजूला शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा विवेकवादी, समताधिष्ठित विचार; तर दुसऱ्या बाजूला अंधश्रद्धा, भोंदूपणा आणि सामाजिक अध:पतन. हा संघर्ष केवळ विचारांचा नाही, तर महाराष्ट्राच्या आत्म्याचा आहे.**

**ऐसे कैसे झाले भोंदू।**
**कर्म करोनि म्हणती साधू।।**
**अंगा लावूनियां राख।**
**डोळे झांकुनी करिती पाप।।**

अभंगातून संत तुकारामांनी विचारलेला जळजळीत सवाल आजच्या महाराष्ट्राच्या वास्तवाला थेट भिडणारा आहे. वैराग्याचे सोंग घेत, दैवी शक्तींचा आव आणणारे तथाकथित 'साधू' प्रत्यक्षात स्वार्थ, पाखंडीपणा आणि अनाचाराचे केंद्र बनत आहेत, हे कटू वास्तव वारंवार समोर येत आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या मूल्यांपासून ते शाहू-फुले-आंबेडकरांनी घडवलेल्या सामाजिक न्याय आणि प्रबोधनाच्या परंपरेपर्यंत विवेक, समता आणि तर्कशुद्धतेचा वारसा लाभलेल्या या पुरोगामी महाराष्ट्रात वाढलेले भोंदूबाबांचे जाळे ही सामाजिक अधोगतीची नांदी आहे.

नाशिकचा भोंदूबाबा कॅप्टन अशोक थोरात प्रकरणाने या संकटाचे भयावह स्वरूप उघड केले. महिलांचे लैंगिक शोषण, अत्याचार, ब्लॅकमेलिंग आणि आर्थिक लूट यांसारख्या आरोपांनी संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडले. मात्र, या घटनेचे गांभीर्य केवळ एका व्यक्तीच्या गुन्ह्यांपुरते मर्यादित नाही; ते एका व्यापक आणि चिंताजनक वास्तवाकडे बोट दाखवते. अशा भोंदूबाबांना मिळणारा सामाजिक स्वीकार, त्यांना लाभणारा राजकीय आश्रय आणि सामान्य माणसाच्या असुरक्षिततेचा घेतला जाणारा गैरफायदा, या सर्वांच्या संगनमताने उभा राहिलेला हा विकृत प्रकार आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ अंधश्रद्धेपुरता मर्यादित राहत नाही; तो समाजाच्या विवेकबुद्धी, नैतिकता आणि संस्थात्मक जबाबदारीची मूलभूत कसोटी ठरतो.



**अंधश्रद्धा आणि विवेकाचा संघर्ष**

महाराष्ट्रातील थोर साधू-संतांनी समाजप्रबोधन करताना अंधश्रद्धेवर कठोर प्रहार केले. महाराष्ट्राने देशाला अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा दिला. डॉ.नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रद्धेविरुद्ध लढा उभारला आणि त्यासाठी प्राणांची आहुती दिली. बदलत्या काळात अंधश्रद्धा गावखेड्यातील जादूटोण्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही. आधुनिक रूप धारण करून तिने समाजात शिरकाव केला आहे. चमत्कारिक उपचार, दैवी शक्ती, आध्यात्मिक मार्गदर्शन अशा आकर्षक शब्दांच्या आडून नव्या पिढीपर्यंतही तिचा प्रभाव पोहोचत आहे. सोशल मीडिया, व्हॉट्सॲप, यूट्यूब यांसारख्या माध्यमांनी या भोंदूपणाला एक प्रकारची वैधता आणि व्यापकता दिली आहे. या अंधश्रद्धेचा सर्वात भीषण पैलू म्हणजे, ती केवळ आर्थिक फसवणुकीपुरती मर्यादित राहत नाही, तर मानवी प्रतिष्ठेवरही घाला घालते. विशेषतः माता-भगिनींचे शोषण, लैंगिक अत्याचार, मानसिक गुलामी यांसारख्या घटना वारंवार समोर येत आहेत. सामाजिक-आर्थिक अस्थिरता, आरोग्य समस्या, कौटुंबिक ताण, यांमुळे माणूस मानसिकदृष्ट्या असहाय्य होतो आणि अशा वेळी ङ्गसर्व समस्यांवर सोपा उपायङ्ख देण्याचा दावा करणारा भोंदूबाबा त्याला सहज आकर्षित करतो. विज्ञान आणि तर्क यांच्याऐवजी अंधविश्वासावर आधारित उपाय अधिक सहज, जलद आणि 'आश्वासक' वाटू लागतात. याचा गैरफायदा अशोक खरातसारखे भोंदूबाबा घेतात. हे समाजासाठी अत्यंत धोकादायक आहे. म्हणूनच, अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा केवळ कायद्यापुरता मर्यादित ठेवून चालणार नाही. तो शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक जागृती यांच्या माध्यमातून अधिक व्यापक पातळीवर लढला पाहिजे. शाळा-कॉलेजांपासून ते माध्यमांपर्यंत तर्कशुद्ध विचारसरणी रुजवणे आणि भोंदूपणाचा सामाजिक बहिष्कार ही काळाची गरज आहे.

**राजकारण आणि भोंदूगिरी**

या प्रकरणातील सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे भोंदूबाबा आणि राजकीय व्यवस्थेतील संबंध. अशा व्यक्तींच्या दरबारात राजकीय नेत्यांची उपस्थिती, त्यांचे सार्वजनिक सन्मान, कार्यक्रमांना दिले जाणारे प्रोत्साहन, हे सर्व त्यांना सामाजिक वैधता प्रदान करते. राजकारण्यांसाठी हे समीकरण फायदेशीर ठरते. धार्मिक-भावनिक मुद्द्यांवर प्रभाव टाकून मतदारांवर पकड मजबूत करता येते. त्यांना भक्त नावाची व्होट बँक मिळते. दुसरीकडे, भोंदूबाबांना राजकीय संरक्षण आणि विस्ताराची संधी मिळते. यामुळे कायद्याची भीती कमी होते आणि गुन्हेगारीला अप्रत्यक्ष प्रोत्साहन मिळते. कॅप्टन अशोक खरात प्रकरणातही अशाच प्रकारच्या संबंधांमुळे कारवाईला विलंब झाला, हे आता समोर येऊ लागले आहे.

**दुहेरी अन्याय**

या प्रकरणातील महिलांवरील अत्याचार ही अत्यंत गंभीर बाब आहे. लैंगिक शोषण, मानसिक छळ, ब्लॅकमेलिंग या सर्व प्रकारांनी महिला केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिकदृष्ट्याही कमजोर होतात. परंतु याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे, महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या राज्य महिला आयोगासारख्या संस्थांच्या भूमिकेवर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह. जर अशा संस्थांच्या प्रमुखांचे भोंदूबाबांशी संबंध असतील किंवा त्यांनी पीडितांबाबत असंवेदनशील भूमिका घेतली असेल, तर पीडित महिलांना न्याय कुठे मिळणार? एकीकडे अत्याचार आणि दुसरीकडे संरक्षण यंत्रणेचे अपयश असा दुहेरी अन्याय पीडित महिलांवर होतो.

**पोलीस आणि प्रशासनाची निष्क्रियता की संगनमत?**

अशा प्रकारचे गुन्हे दीर्घकाळ सुरू राहतात, तेव्हा पोलीस आणि प्रशासनाची भूमिका प्रश्नांकित होते. जर माहिती नव्हती, तर गुप्तचर यंत्रणा अपयशी ठरते. जर माहिती असूनही कारवाई झाली नाही, तर तो दबाव किंवा संगनमताचा मुद्दा ठरतो. कायद्याचे राज्य टिकवण्यासाठी पो-लीस यंत्रणेची स्वायत्तता आणि निष्पक्षता अत्यावश्यक आहे. परंतु राजकीय हस्तक्षेपामुळे ही स्वायत्तता बाधित होत असल्याचे अनेकदा दिसून येते. श्रद्धेच्या आड लपलेले साम्राज्य भोंदूबाबांचे साम्राज्य हे केवळ आध्यात्मिक नसते; ते आर्थिकदृष्ट्याही अत्यंत प्रभावी असते. ट्रस्ट, दान, जमीन व्यवहार, कार्यक्रम या सर्व माध्यमांतून प्रचंड पैसा गोळा केला जातो. या पैशाच्या वापराबाबत पारदर्शकता नसते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

**वरुड :** वरुड तालुका सरकारी निमसरकारी कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विलास टाकरखेडे यांचा वाढदिवस शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना माजी अध्यक्ष रामदास कडु, संचालक संजय ठाकरे, मनोहर गणोरकर, उमेश निकम व किशोर पाटील



पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना संचालक विलास दुपारे तथा जरुड हायस्कूल जरुडचे प्राचार्य ओमप्रकाश दुपारे.



पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना चित्रलेखा प्रिंटर्सचे संचालक गणेश लेकुरवाळे तथा माजी समादेशक जयप्रकाश गाडगे.



पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना पतसंस्थेचे मुख्य व्यवस्थापक विजय कडू, लोचन टाकरखेडे , महेश बोरकुटे, राहूल पांडव, किरण अनवाने, बंटी चौधरी, प्रतिक गेडाम, प्रमोद बांबल, सौरभ भोसले, सचिन राऊत, नवप्रभात कर्मचारी नागरी सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक विवेक चौधरी व इतर.



पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना विजय खोडस्कर, राजकुमार पुनसे, अनिल चहांदे, आनंद कुकडे, राजेंद्र बांबल, प्रभाकर टाकरखेडे, विजय तिवस्कर, जगदीश वानखडे व इतर.



पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना संस्थेचे राजेश ठाकरे, मानद सचिव आशिष पावडे, कोषाध्यक्ष महेश्वर पवार, संचालक गजानन देशमुख, मनोहर गणोरकर, अनिल चहांदे, संदीप बोबडे, मो.नईम, किशोर वैराळे, संजय ठाकरे, सुरेंद्र वसुले, दिनेश उंबरकर, विजय खोडस्कर.

# प्रभू श्रीराम हे जीवनाचा आदर्श : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पश्चिम नागपूर, पोद्दारेश्वर राम मंदिराच्या शोभायात्रांना उपस्थिती

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नागपूर** – समाजात सर्व प्रकारचे आदर्श प्रस्थापित करण्याचे कार्य प्रभू श्रीरामचंद्र यांनी केले. त्यामुळेच श्रीराम हे आपल्या सर्वांच्या जीवनाचा आदर्श असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यांनी केले.

पश्चिम नागपूर नागरिक संघातर्फे श्रीराम नवमी निमित्त काढण्यात येणाऱ्या शोभयात्रेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.





रामनगर येथील श्रीराम मंदिर परिसरात हा कार्यक्रम झाला. समाजात समता असली पाहिजे हे प्रभू श्रीरामांनी आपल्या जीवनातून दाखवून त्याच प्रकारे कार्य केल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगतानाच उपस्थिताना श्रीराम नवमीच्या शुभेच्छा दिल्या. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आ.विकास ठाकरे, खा.माया इवनते यावेळी अतिथी म्हणून उपस्थित होते. सायंकाळी मंदिरात आगमन होताच मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रभू श्रीरामांच्या मूर्तीचे दर्शन घेतले.

त्यानंतर अतिथींच्या हस्ते पालखी पूजन व आरती करण्यात येऊन शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली. यावेळी पश्चिम नागपूर नागरिक संघाचे अध्यक्ष रवी वाघमारे, सरचिटणीस राजीव काळेले, मनपा स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, योगेश पाचपोर, अनिरुद्ध पालकर, प्रवीण महाजन प्रभृती उपस्थित होते. पोद्दारेश्वर राम मंदिर नागपूर नगरीचे ठळक वैशिष्ट्य असलेल्या पोद्दारेश्वर राम मंदिरातर्फे काढण्यात येणाऱ्या शोभयात्रेतही मुख्यमंत्री फडणवीस सहभागी झाले होते. या शोभायात्रेचे यंदा साठावे वर्ष आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खा.माया इवनते, आ.प्रवीण दटके, महापौर नीता ठाकरे, माजी मंत्री रमेश बंग, माजी महापौर दयाशंकर तिवारी, प्रा.अनिल सोले यांच्या हस्ते प्रारंभी राम, लक्ष्मण, सीता माई यांच्या मूर्तीची पूजा करून श्रीरामाची आरती करण्यात आली. त्यानंतर जय श्रीरामच्या जयघोषात अतिथिनी रथ ओढून शोभायात्रेचा शुभारंभ केला.

# सशक्ती कॉन्क्लेव्ह २०२५-२६ चे मुंबईत उद्घाटन

## लर्निंग लिंक्स फाउंडेशन व मास्टरकार्डच्या सहकार्याने महिलांना डिजिटल सक्षमीकरणाचा मोठा आधार

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – लर्निंग लिंक्स फाउंडेशन आणि मास्टरकार्ड यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे महिलांना डिजिटल साक्षरता, आर्थिक नियोजन आणि व्यवसाय उभारणीसाठी मोठा आधार मिळत असून, या माध्यमातून महिलांचे आर्थिक




सक्षमीकरण अधिक प्रभावीपणे होत असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संघर्षशील आणि जिद्दी माता-भगिनींच्या प्रवासाचा प्रेरणादायी संवाद उलगडण्यात आला. यावेळी महिला आर्थिक विकास महामंडळाचे रायगड जिल्ह्याचे जिल्हा समन्वय अधिकारी विजय ढोके, मास्टरकार्डचे उपाध्यक्ष श्री. हरीश बाबू एस.एन., वरिष्ठ व्यवस्थापक (कायदेशीर) श्री.सरथ चंद्रण, लर्निंग लिंक्स फाउंडेशनच्या ट्रस्टी ॲग्नेस नाथन, वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक अपूर्वा शिंदे तसेच विविध संस्था, माविम आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाचे अधिकारी उपस्थित होते. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या माध्यमातून अनेक महिलांनी बचतीतून लघुउद्योग सुरू केले असून, या महिलांना लर्निंग लिंक्स फाउंडेशन आणि मास्टरकार्डच्या सहकार्याने दिले जाणारे प्रशिक्षण, भांडवल आणि मार्गदर्शन यामुळे व्यवसाय उभारणीसाठी तसेच उत्पादने बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी मोठी मदत मिळत आहे.

# मुंबई-चेन्नई यांच्यात २३ एप्रिल रोजी थरार! आयपीएलच्या १९व्या हंगामाचे उर्वरित वेळापत्रक जाहीर

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) १९व्या हंगामाचे उर्वरित वेळापत्रक गुरुवारी जाहीर करण्यात आले. ३१ मार्चपर्यंत रंगणाऱ्या या स्पर्धेत यंदाही एकूण ७० साखळी सामने होतील. बाद फेरीच्या तारखा व ठिकाण नंतरला स्पष्ट होतील. यंदा चाहत्यांना वानखेडे स्टेडियमवर गुरुवार, २३ एप्रिल रोजी मुंबई



इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यातील लढतीचा थरार अनुभवायला मिळेल. धोनीचा हा वानखेडेवर अखेरचा सामना ठरू शकतो.

काही आठवड्यांपूर्वी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर टी-२० विश्वचषकाच्या महामुकाबल्यात भारताने न्यूझीलंडचा ९६ धावांनी फडशा पाडला. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारताने एकंदर तिसऱ्यांदा, तर सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम केला. भारताच्या या विश्वविजयात अनेक हिऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले. भारत हा सलग दोन टी-२० विश्वचषक जिंकणारा तसेच मायदेशात जेतेपद मिळवणारा पहिलाच संघ ठरला. आता आयपीएलच्या १९व्या हंगामाचे वेध सर्वांना लागले आहेत. २८ मार्चपासून आयपीएलचा नवा हंगाम सुरू होईल. रजत पाटिदारच्या नेतृत्वात खेळणारा गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ स्पर्धेचा सलामीचा सामना खेळणार आहे. चिन्नास्वामी स्टेडियमवर होणाऱ्या या लढतीत बंगळुरूसमोर सनरायजर्स हैदराबादचे आव्हान असेल. काही दिवसांपूर्वी १२ एप्रिलपर्यंतच्या २० सामन्यांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. पश्चिम बंगाल, तमिळनाडू व आसाम येथे निवडणुका होणार असल्याने पुढील वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येईल, असे त्यावेळी बीसीसीआयने स्पष्ट केले होते.

# सशक्त लोकशाहीसाठी प्रामाणिक व चारित्र्यसंपन्न लोकप्रतिनिधी निवडा

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी सचिव शेषराव खाडे यांचे प्रतिपादन

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – भारतीय संविधानाची उद्देशिका फार महत्त्वाची आहे, सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य अबाधित ठेवण्यासाठी देशातील नागरिकांनी जागृत असलं पाहिजे. लोकशाही जिवंत ठेवण्याचे काम जर कोणी करु शकत असेल तर ते मतदार होय. मतदारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता निरपेक्ष भावनेने प्रामाणिक व चरित्र्यसंपन्न असा प्रतिनिधी निवडावा, जेणे करुन सशक्त लोकशाही निर्माण होऊ शकेल असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे माजी सचिव शेषराव खाडे यांनी केले.



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालय जरुड येथील रासेयो पथकाचे विशेष श्रम संस्कार शिबिर दत्तक ग्राम रवाळा येथे संपन्न झाले. बौद्धिक क्षेत्रात भारताचे संविधान या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी शेषराव खाडे उपस्थित होते, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जी.आर.तडस तर प्रमुख अतिथी म्हणुन संस्थेचे आजीवन सभासद डॉ.निळकंठ यावलकर उपस्थित होते.

सर्वप्रथम वैराग्यमुर्ती संत गाडगेबाबा व शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. प्रास्तविकातुन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.शशिकांत काळे यांनी कार्यक्रमाची रुपरेषा मांडली. प्रमुख अतिथी डॉ.निळकंठ यावलकर सुध्दा मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन ऋतुजा ढोकणे तर आभार रागिणी बारमासे हिने मानले. याप्रसंगी रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी अर्चना राऊत, प्रा.लीलाधर चौधरी, दुर्गा हरले, रासेयो स्वयंसेवक गायत्री भंडारे, ईश्वरी बोहरुपी, पवन धुर्वे, अनुप बगेकर, ऋतुजा ढोकणे, भुमिका ढोकणे, दर्शन महल्ले, तनुजा वानखडे, सुरज भोरे, अजय ढोमणे, प्रज्वल बोळाखे, ओम भोजने, अभिषेक धुर्वे, दृष्टी चव्हाण, तनुजा पोकळे, कृतिका चरपे, धनश्री पोकळे, तेजश्री कळसकर, अंकिता नागदेवते, गायत्री पापलकर, किशोरी दुधकवरे, नेहा कांडलकर, रागिणी बारमासे, वंश टेकाडे, वैभव मालपे, यशवंत कुसराम, रोशन केचे, कृणाल चव्हाण, वैष्णव नरसिंगकर, नीरज वानखडे आदी उपस्थित होते.

# शक्तिवर्धक गोळ्या खाऊन अशोक खरातला अर्धांग वायूचा आलेला झटका : एका हाताची हालचाल मर्यादित, भुवईत बदल, तपासात नवीन खुलासा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नाशिक** – नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या ओकस कार्यालयावर एसआयटीने मोठी कारवाई केली आहे. पंचांच्या समक्ष कार्यालयाला सील करत टाळं ठोकण्यात आलं आहे. एसआयटी आणि फॉरेन्सिक टीमने कार्यालयाची सखोल पाहणी केली असून तपासाला वेग दिला आहे. दरम्यान, फॉरेन्सिक टीमने कार्यालयातून प्रिंटर आणि महत्त्वाची कागदपत्रं ताब्यात घेतली आहेत. या कारवाईमुळे प्रकरणात नवे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भोंदूबाबा अशोक खरातबाबत आणखी एक खुलासा समोर आला आहे. अपघात आणि अर्धांग वायूच्या झटक्यानं अशोक खरात बेजार झाला होता. दीड



वर्षांपूर्वी खरातला अर्धांगवायूचा झटका आल्याची माहिती समोर आली आहे. उत्तेजक (शक्तिवर्धक) औषधांच्या अतिसेवनामुळे प्रकृती बिघडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. यावर अशोक खरातने शहरातील खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले होते.डॉक्टर भक्ताने वेळीच उपचार करून जीव वाचवला. आजही एका हाताची हालचाल मर्यादित झाली होती. भुवईत बदल दिसून येत असल्याची माहिती मिळत आहे. तसेच उत्तेजक औषध घेणं अशोक खरातला जीवावर बेतलं असतं. अशोक खरातच्या तपासातून महत्त्वाची वैद्यकीय माहिती समोर येण्याची शक्यता आहे. अशोक खरातच्या कखत टेस्टचा रिपोर्ट समोर- पोलीस कोठडीची हवा खाणाऱ्या अशोक खरातची कखत टेस्ट करण्यात आली असून ती निगेटिव्ह आली आहे. भविष्य सांगण्याचा बहाण्याने अशोक खरात याने १५० हून अधिक महिलांवर अत्याचार केल्याचं पोलीस तपासात उघडकीस आले आहे, नाशिक पोलिसांत दाखल झालेल्या ८ गुन्ह्या पैकी ७ गुन्हे महिला अत्याचार संदर्भात आहे.

# पुण्यात स्वदेशी 'डिजिटल हवामान निरीक्षण प्रणाली' विकसित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – हवामान निरीक्षण क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल टाकत भारतीय हवामान विभागाने पुणे वेधशाळेत पूर्णपणे स्वदेशी बनावटीची 'डिजिटल सरफेस मेट्रोलॉजिकल ऑब्झर्व्हेशन सिस्टम' विकसित केली आहे. या अत्याधुनिक प्रणालीमुळे हवामान अंदाजाच्या वेग आणि अचूकतेत मोठी सुधारणा होणार असून, रिअल-टाइम डेटा उपलब्ध होणार आहे.


जागतिक हवामान दिनानिमित्त भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांच्या हस्ते या प्रणालीचे आभासी उद्घाटन करण्यात आले. पारंपरिक पद्धतींच्या तुलनेत ही डिजिटल प्रणाली दर मिनिटाला हवामानाची नोंद घेऊ शकते.

त्यामुळे वातावरणातील बदलांचे सतत आणि सूक्ष्म निरीक्षण शक्य होणार आहे.

# बंगालमध्ये करू 'यूपीस्टाईल एन्काऊंटर': भाजप नेत्यांचे असेही आश्वासन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*कोलकाता :* – बंगालमध्ये भाजप सत्तेत आला तर उत्तर प्रदेशाप्रमाणे पोलीस चकमकी घडवून गुन्हेगारी संपवून टाकली जाईल, असा दावा भाजपचे ज्येष्ठ नेते दिलीप घोष यांनी केला आहे. आपल्या जुन्या बालेकिल्ल्यात म्हणजेच खड्गपूर येथे निवडणूक



प्रचारादरम्यान बोलताना, भाजपच्या या माजी प्रदेशाध्यक्षांनी असा आरोप केला की, पश्चिम बंगालमधील पोलीस सध्या सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या इशाऱ्यावर काम करत असून गुन्हेगार आणि 'माफिया'विरुद्ध कारवाई करण्यास अपयशी ठरत आहेत. जे पोलीस आज माफियांसोबत बसून चहा पिताना आणि भ्रष्ट नेत्यांचे 'चमचे' म्हणून काम करताना दिसत आहेत, त्यांची वागणूक बदलून जाईल. हेच पोलीस उत्तर प्रदेशच्या धर्तीवर एन्काऊंटर करतील आणि गुन्हेगारांना तुरुंगात टाकतील, असे घोष म्हणाले. उत्तर प्रदेशातील भाजप सरकारच्या 'एन्काऊंटर' मॉडेलचा उल्लेख करणाऱ्या त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वादळ निर्माण झाले आहे. सत्ताधारी तृणमूल काँग्रेसने भाजपवर उघडपणे बेकायदेशीर हिंसेचे समर्थन केल्याचा आरोप केला आहे. कोलकाताचे महापौर फिरहाद हकीम म्हणाले, एन्काऊंटर संस्कृती उत्तर प्रदेशात चालते, बंगालमध्ये नाही. निवडणूक आयोगाने त्यांच्या भाषणाची दखल घेतली पाहिजे.

# कर्नाटकात मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी

## एका निश्चित वेळेनंतर इंटरनेट बंद करण्याची तरतूद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**बंगळुरु** – कर्नाटक सरकारने १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदीची घोषणा केली. असे करणारे कर्नाटक हे देशातील पहिले राज्य आहे. आपल्या अर्थसंकल्पीय भाषणा दरम्यान, मुख्यमंत्री सिद्धरामय्या म्हणाले की, मुलांमध्ये मोबाईल आणि सोशल मीडियाच्या वापरात झपाट्याने होणाऱ्या वाढीचा त्यांच्यावर नकारात्मक परिणाम होत आहे.

कर्नाटक सरकारने इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी डिजिटल वापरासंदर्भात धोरणाचा मसुदा प्रसिद्ध केला. त्यामध्ये अभ्यासा व्यतिरिक्त मनोरंजनासाठी




दररोज एक तास स्क्रीन टाइम मर्यादित ठेवण्याची शिफारस करण्यात आली आहे.

एका निश्चित वेळेनंतर इंटरनेट बंद करण्याची तरतूद तसेच सायंकाळी ७ वाजल्यानंतर इंटरनेट बंद करण्याची शिफारस देखील करण्यात आली आहे. या मसुद्यानुसार, झोपण्यापूर्वी एक तास विद्यार्थ्यांना स्क्रीनपासून दूर ठेवले पाहिजे. मोबाईल फोनसाठी 'चाइल्ड प्लॅन' सुचवण्यात आला आहे, ज्यामध्ये केवळ ऑडिओचा पर्याय आणि एका निश्चित वेळेनंतर इंटरनेट बंद करण्याची तरतूद असेल. तसेच त्यांच्या वयानुसार योग्य उपकरणे आणि ऑपरेटिंग सिस्टीम विकसित करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. सरकारच्या मते, अंदाजे २५ टक्के किशोरवयीन मुले इंटरनेटच्या व्यसनात अडकली आहेत, ज्यामुळे झोपेची कमतरता, चिंता आणि लक्ष विचलित होणे यांसारख्या समस्या निर्माण होतात. हे लक्षात घेऊनच हे धोरण सादर करण्यात आले आहे. शाळांमध्ये बदल होतील: डिजिटल आरोग्य आणि ऑनलाइन सुरक्षितता अभ्यासक्रमाचा भाग बनतील. सायबरबुलिंग, गोपनीयता आणि जबाबदार ऑनलाइन वर्तन शिकवले जाईल. प्रत्येक शाळा डिजिटल वापराचे धोरण लागू करेल. डिजिटल डिटॉक्स दिवस आणि तंत्रज्ञान-मुक्त कालावधी असेल.

## डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आजचा युवक विषयावर कार्यशाळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

*शेंदुरजनाघाट* – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्थाद्वारा संचालित जे.जे.खेरडे प्राथ.व उच्च प्राथ. शाळेमध्ये इंडियन टॅलेंट अकॅडमी द्वारा आयोजित इंटरनॅशनल सायन्स, मॅथ्स, इंग्लिश, हिंदी, जीके आणि ड्रॉईंग ओलंपियाड या विषयनिहाय स्पर्धा परीक्षेमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही यशाची परंपरा राखत या स्पर्धा परीक्षेत एकूण ५ विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर यश संपादन करुन शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे.



यामध्ये इयत्ता १ लीचा विद्यार्थी हिमेश ठाकरे मॅथ्स ओलंपियाडमध्ये राज्यातून १९ वा मेरिट व एक्सलन्स मेडल अवॉर्डचा मानकरी, इयत्ता ३ री ची विद्यार्थिनी सर्वस्वी सत्यपाल काळबांडे इंटरनॅशनल मॅथ्स ओलंपियाड मध्ये राज्यातून वी १७ वी मेरिट व एक्सलन्स मेडल अवॉर्डची मानकरी, जान्हवी फुटाणे इयत्ता ४ थी ही विद्यार्थिनी इंटरनॅशनल मॅथ्स ओलंपियाडमध्ये राज्यातून ४ थी मेरीट आली असून स्टेट टॉपर अवार्ड व एक हजार रुपये स्कॉलरशिपची मानकरी, रितिक मोहोड इयत्ता ५ वी इंटरनॅशनल मॅथ्स ओलंपियाडमध्ये राज्यातून २१ वा मेरिट व एक्सलन्स मेडल अवॉर्डचा मानकरी तर शर्मिष्ठा कडू इयत्ता ४ थी ही विद्यार्थिनी इंटरनॅशनल आर्ट ओलंपियाडमध्ये राज्यातून ६ वी मेरिट आली असून स्टेट टॉपर अवॉर्ड व सातशे रुपये स्कॉलरशिपची मानकरी ठरली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष संजय गणोरकर, उपाध्यक्ष पुरुषोत्तम कळमकर, सचिव जगदीश नेरकर, सहसचिव शामसुंदर खेरडे तथा सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक भूपेंद्र पोहरकर, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

**वरुड : मर्यादा पुरुषोत्तम, रघुनंदन, रघुपती, दशरथनंदन, शूरवीर, अयोध्याधीश भगवान श्री राम नवमी निमित्ताने शहरात भव्य दिव्य अशा शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेमध्ये विविध राजकीय नेते, पदाधिकाऱ्यांसह अनेकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला होता.**



अखेर मिठागराची जागा मिळाली

# गांधी मार्केट, चेंबूर, नेहरु नगर होणार पूरमुक्त , १४ वर्षांनंतर माहुल पंपिंग स्टेशनचा मार्ग मोकळा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** - माहुल पंपिंग स्टेशनसाठी मिठागराची ६.१७६ एकर जागा देण्यास केंद्र सरकारच्या सॉल्ट कमिशनने अखेर हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे १४ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर रखडलेल्या माहुल पंपिंग स्टेशनचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे पावसाळ्यात कुर्ला, शीव, चेंबूर आदी भाग पाण्याखाली जाण्याचे प्रकार आता थांबतील, अशी आशा निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे अतिशय कमी मोबदल्यात ही जमीन पालिकेला मिळाली आहे. या जमिनीसाठी १५० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. मात्र अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी केंद्र सरकारशी चर्चा करून फक्त १५ कोटी रुपयांत ही जमीन पालिकेच्या ताब्यात घेतली आहे. माहुल पंपिंग स्टेशनचे काम पूर्ण झाल्यानंतर गांधी मार्केट चेंबूर, सिंधी सोसायटी, नेहरु नगर, माटुंगा, कुर्ल्यासह सायन रेल्वे स्थानक लवकरच पूरमुक्त होईल, असा विश्वास पालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे.

राज्यात ३०-३१ मार्चला वादळी पावसाची शक्यता

# काढणी केलेली पिके सुरक्षित ठेवण्याचे कृषी विभागाचे आवाहन

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

*मुंबई* - सध्या राज्यातील काही भागात अंशतः आभाळी हवामान असून ही स्थिती या आठवड्यात कायम राहण्याची शक्यता आहे.

राज्याच्या दक्षिण भागांमध्ये दुपारनंतर काही ठिकाणी वादळी पाऊस पडू शकतो. हा पाऊस प्रामुख्याने कर्नाटक आणि तेलंगणा सीमेलगत



असलेल्या मराठवाडा, मध्य महाराष्ट्र व विदर्भातील सीमावर्ती भागांमध्ये पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. तर राज्यातील काही भागांमध्ये ३० मार्च दरम्यान प्रामुख्याने दुपारनंतर ढगाळ हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते.

उर्वरित विदर्भात देखील हवामानात बदल दिसू शकतो. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता नाकारता येत नाही. ३१ मार्च रोजी देखील राज्याच्या काही भागांमध्ये या हवामानाचा परिणाम दिसू शकतो.

# केंद्र सरकारनं पेट्रोल आणि डिझेलवर उत्पादन शुल्क कमी केलं

वाढत्या किमतींना आळा घालण्यासाठी निर्णय

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



*नवी दिल्ली* - कच्च्या तेलाच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी करून तेल कंपन्या आणि सर्वसामान्य जनतेला दिलासा दिला आहे. वृत्तसंस्थांच्या माहितीनुसार, पेट्रोलवरील उत्पादन शुल्क, जे प्रति लिटर १३ होते, ते आता १० ने कमी करून ३ करण्यात आले आहे. डिझेलवरील उत्पादन शुल्क, जे प्रति लिटर १० होते, ते आता पूर्णपणे रद्द करण्यात आले आहे, म्हणजेच शून्य करण्यात आले आहे. या निर्णयामुळे तेल कंपन्यांच्या नफ्यात वाढ होण्याची अपेक्षा आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींना आळा घालण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे.

उत्पादन शुल्क म्हणजे काय? हा वस्तूंच्या उत्पादनावर किंवा निर्मितीवर आकारला जाणारा एक अप्रत्यक्ष कर आहे. हा कर केंद्र सरकारद्वारे आकारला जातो, ज्यामुळे वस्तूंच्या किमती वाढतात. भारतात, केंद्र सरकार पेट्रोल आणि डिझेलवर उत्पादन शुल्क आकारते आणि राज्य सरकारे व्हॅट लावतात. तथापि, सरकारने आता उत्पादन शुल्क कमी केले आहे.

नायराकडून पेट्रोलच्या दरात ५ आणि डिझेलच्या दरात ३ ची वाढ काल सकाळी, नायरा एनर्जीने पेट्रोलच्या दरात प्रति लिटर ?५ आणि डिझेलच्या दरात ?३ ची वाढ केली. नायरा एनर्जीने केलेली ही दरवाढ वेगवेगळ्या राज्यांमधील स्थानिक कर आणि व्हॅटनुसार बदलू शकते.

इराण युद्धावर आज मोदी मुख्यमंत्र्यांशी बोलणार पंतप्रधान नरेंद्र मोदी आज २७ मार्च रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मुख्यमंत्र्यांशी संवाद साधणार आहेत. इराण युद्धानंतर बिघडलेल्या परिस्थितीवर चर्चा होण्याची शक्यता आहे. निवडणूक राज्यांचे मुख्यमंत्री यात सहभागी होणार नाहीत.

लक्ष्मी नारायण मंदिरात धाडसी चोरी

# २१ हजार ७०० रुपयांचा ऐवज लंपास

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** - येथुन जवळच असलेल्या लोणी येथील लक्ष्मी नारायण मंदिरात अज्ञात चोरट्याने मंदिराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि गाभाऱ्यातील मौल्यवान पितळी व तांब्याच्या वस्तूंसह दानपेटीतील रोकड असा एकूण २१ हजार ७०० रुपयांचा मुदेमाल चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे.



या घटनेमुळे परिसरात खळबळ माजली असून देवाच्या दारीही आता चोऱ्या वाढल्याने भाविकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार अज्ञात इसमाने मंदिराच्या दरवाजाचे कुलूप तोडून गाभाऱ्यात प्रवेश केला. चोरट्याने गाभाऱ्यातील मौल्सवान साहित्य असा सुमारे २१ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला. केवळ वस्तूच नव्हे तर चोरट्याने मंदिराच्या दानपेटीचेही कुलूप तोडून त्यातील अंदाजे ७०० रुपयांची रोकड चोरुन नेली. अशाप्रकारे एकूण २१,७०० रुपयांचा माल चोरीला गेला आहे.

या प्रकरणी तक्रार प्राप्त होताच बेनोडा (शहीद) पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांच्या आधारे चोरट्याचा शोध सुरु आहे.

